N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** जालना **P.S.(ठाणे):** अंबड
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0167 **Year (वर्ष):** 2024
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 31/03/2024 04:17

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** शनिवार **Date From (दिनांक पासून):** 30/03/2024
**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 30/03/2024
**Time From (वेळेपासून):** 16:15 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 16:15 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक):** 31/03/2024 **Time (वेळ):** 03:57 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 006
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 31/03/2024 03:57 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 02 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** तालुका आरोग्य अधिकारी,कार्यालय, अंबड जि जालना येथे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** अविनाश सुखदेव देशमुख

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1992

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रो हाऊस नं सी-4 गट नं 106/P,बीडबायपास छत्रपती संभाजीनगर,अंबड , जालना,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रो हाऊस नं सी-4 गट नं 106/P,बीडबायपास छत्रपती संभाजीनगर,अंबड , जालना,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):** वैदयकीय व्यावसायी

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9696704343

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | शामकांत दत्तात्रय गावंडे | | | 1. कासलीवाल मार्वल, पश्चिम बंगला ,IB-18 बीडबायपास, निशांत पार्क,,छत्रपती संभाजीनगर ,अंबड ,जालना, महाराष्ट्र,भारत |
| 2 | पंडीत भीमराव कळकुंबे | | | 1. प्लट नं 11 शिवनगर, दत्तमंदीर, जवळ जुना जालना जि जालना , अंबड ,जालना,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | जप्त लाचेची रक्कम 20,000 रूपये | 20,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**
20,000.00

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद दि. 31/03/2024

मी डॉ.अविनाश सुखदेव देशमुख वय-32 वर्षे व्यवसाय- नोकरी, पद-वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र, वडीगोद्री, जामखेड ता. अंबड जि.जालना रा. रो हाऊस नं. सी-4 गट नं. 106/P देवळाई बीडबायपास छत्रपती संभाजीनगर मो.क्र. 9696704343.

मी दिनांक 14/03/2024 रोजी पोलीस निरीक्षक, हनुमंत वारे, यांचेकडे दोन पंचासमक्ष तक्रार दिली की, मी वरील ठिकाणी राहात असुन मी वैद्यकीय अधिकारी, या पदावर कार्यरत आहे. माझे कडे जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यातील जामखेड येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचा पदभार असुन वडीगोद्री ता. अंबड जि. जालना येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचा वैद्यकीय अधिकारी या पदाचा अतिरीक्त पदभार आहे.

जामखेड व वडीगोद्री प्राथमिक आरोग्य केंद्र, अंतर्गत सन-2023 मध्ये माहे-सप्टेंबर, ऑक्टोबर, नोव्हेंबर, डिसेंबर महिन्यामध्ये मानव विकास शिबीर अंतर्गत दरमहा दोन असे एकुण आठ शिबीर घेण्यात आलेले आहेत. सदर शिबीरावर होणारा खर्च शासनातर्फे बीले सादर केल्यानंतर मिळतो.तसेच प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्राला रुग्ण कल्याण समिती (आर.के.एस) या हेडखाली प्रतीवर्षी 1,30,000/- रुपये येतात. ती रक्कम वर्षभर खर्च करावयाची असते. सदरची,रक्कम वर्षभर खर्च न झाल्यास वर्षाअखेरीस मार्च महिन्यामध्ये ती खर्च करावी लागते. त्यासाठी आर.के.एस.ची बीले सादर करावी लागतात.

सन-2023 मधील माहे-सप्टेंबर, ऑक्टोबर, नोव्हेंबर, डिसेंबर या महिन्यात प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रा अंतर्गत प्रतिमाह दोन शिबीरे या प्रमाणे आठ शिबीरांची बीले खर्च करण्यात आलेल्या पावत्यासह तालुका आरोग्य अधिकारी, श्री. गावंडे साहेब यांच्या अंबड येथील कार्यालयात फेब्रुवारी-2024 अखेर सादर करण्यात आलेली होती परंतु तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयाने पोहोच दिली नव्हती. सदर बिलात जेवण, औषधी व स्त्री रोग तज्ञ व बाल रोग तज्ञ डॉक्टर यांची बीले तयार करुन तालुका आरोग्य अधिकारी, श्री. गावंडे यांच्याकडुन पडताळणी करुन गट विकास अधिकारी, पंचायत समिती अंबड यांचेकडे सादर होणार आहे. सदर बिलामध्ये मी कँप च्या दिवशी स्व: खर्चातुन औषधी आणल्या असल्या कारणाने लाभार्थांच्या यादीमध्ये प्रत्येक कँपचे बीलामध्ये माझे सुध्दा नाव आहे. तालुका आरोग्य अधिकारी, श्री. गावंडे साहेब यांनी मी सादर केलेल्या एकुण आठ बिलावर पडताळणी करुन पंचायत समिती अंबड कडे न पाठवल्याने मी दिनांक 07/03/2024 रोजी श्री. गावंडे यांची अंबड येथील कार्यालयात जाऊन भेट घेऊन सदर आठ बिलाबाबत चर्चा केली असता श्री. गावंडे यांनी सांगितले की, तुमची दोन्ही प्राथमिक आरोग्य केंद्राची मानव विकास शिबीर अंतर्गत घेतलेल्या कँपची बीले माझ्याकडुन पडताळणी करुन पंचायत समिती अंबड यांचेकडे पाठवायची असेल तर मला प्रती कँपचे बीला प्रमाणे 1,000/- रुपये प्रमाणे मला द्यावे लागतील. जर तुम्ही प्रती बील 1,000/- रुपये प्रमाणे दिले नाही तर मार्च अखेर सादर होणारी बीले पंचायत समिती अंबड यांचेकडे पाठवणार नाही. असे म्हणाले तसेच आर.के.एस अंतर्गत खर्च होणाऱ्या बिलांवर सुध्दा तुम्हाला काही (आकडा सांगितला नव्हता) रक्कम द्यावी लागेल असे म्हणाले होते. मी नाईलाजास्तव मानव विकास शिबीर अंतर्गत घेतलेल्या प्रती कँपचे 1,000/- रुपये प्रमाणे देतो असे म्हणुन निघुन आलो होतो. तालुका आरोग्य अधिकारी, श्री. गावंडे हे माझ्या अंतर्गत जामखेड व वडीगोद्री अंतर्गत प्रतीमाह मानव विकास शिबीर अंतर्गत घेतलेल्या प्रती कँप

प्रमाणे मागत असलेले 1,000/- रुपये लाचेचे मागत असल्याने माझे लक्षात आले. श्री. गावंडे यांना मला लाच देण्याची इच्छा नाही. श्री. गावंडे व माझा देण्या घेण्याचा,उसणवारीचा व्यवहार नसुन वैरदुष्मणी नाही. मी वडीगोद्री प्राथमिक आरोग्य केंद्र तसेच जामखेड प्राथमीक आरोग्य केंद्र येथील मानव विकास शिबीर अंतर्गत घेतलेल्या कँपची बीले सादर केल्यानंतर तालुका आरोग्य अधिकारी, श्री. गावंडे यांची भेट घेणार आहे. तेव्हा मी त्यांना सादर केलेल्या वडीगोद्री प्राथमिक आरोग्य केंद्र येथील मानव विकास शिबीर अंतर्गत घेतलेल्या 08 कँपची बीला संदर्भाने तसेच जामखेड प्राथमिक आरोग्य केंद्र, अंतर्गत सन-2023 मध्ये मानव विकास शिबीर अंतर्गत कँपवर खर्च झालेले बील सादर करण्याबाबत चर्चा करणार आहे. त्यावेळी श्री. गावंडे हे माझे अंतर्गत येणाऱ्या वडीगोद्री व जामखेड येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये मानव विकास शिबीर अंतर्गत घेतलेल्या कँपचे सादर केलेल्या व सादर होणाऱ्या बिलांसंदर्भाने प्रती कँप 1,000/- रुपये प्रमाणे लाचेची मागणी करुन स्वत: अगर इतरा मार्फत स्विकारतील तेव्हा त्यांना पकडुन त्यांचेवर कायदेशीर कारवाई करावी वगैरे मजकुराची तक्रार दिल्याने पोलिस निरीक्षक श्री वारे यांनी दोन शासकीय पंचासमक्ष लाचमागणी पडताळणी करण्याचे ठरविले.
त्यानुसार दोन पंचासह व सापळा पथकासह दिनांक 19/03/2024 रोजी तालुका आरोग्य अधिकारी, कार्यालय अंबड जि. जालना येथे पंचासमक्ष शासकीय व्हाईस रेकॉर्डरसह लाचमागणी पडताळणी केली असता, श्री. गावंडे यांनी त्यांचे टेबलवरील एक कागद काढुन कागदावर पेनाने पर कँम्प बील 1000/- रुपये प्रमाणे असे लिहुन श्री गावंडे यांनी मला हु करुन टाका, असे म्हणाले तेव्हा मी त्यांना म्हणालो की पर कँम्प हजार म्हणलं तर, सर तेवीस म्हणल्यावर तेवीस हजार जास्त होतील ना, त्यावेळी श्री. गावंडे म्हणाले की, तुम्हीच मला सपोर्ट करायला पाहिजे ह्या गोष्टींचा, तुमचा काय पायंडा पडलेला आहे, असे म्हणुन माझे बील पडताळणीसाठी पंचायत समिती अंबड,येथे पाठविण्यासाठी पर कँप 1000/- रुपये प्रमाणे लाचेची मागणी करुन लाच स्विकारण्याचे मान्य केले.

त्यानंतर मी पोलीस निरीक्षक श्री. वारे यांना कळविले की, आज दिनांक 30/03/2024 रोजी मी तालुका आरोग्य अधिकारी, कार्यालय अंबड येथे जाऊन श्री. गावंडे याची भेट घेवुन त्यांना त्यांनी मागणी केलेले पर कँप 1,000 रुपये प्रमाणेचे पैसे जास्त होतात असे म्हणुन पुर्वीचे 23 व नंतरने सादर केलेली दोन बिले असे एकुण 25 कँम्पचे तडजोडी अंती 20,000/- रुपये देणार आहे. तेव्हा तुम्ही अंबड येथे येऊन श्री. गावंडे यांचेवर सापळा कारवाई करावी. असे कळविले. त्यावरुन श्री. वारे हे त्यांचे सापळा पथकासह अंबड येथे सुरक्षित ठिकाणी हजर आले. तेव्हा मला पोलीस निरीक्षक वारे यांनी थोडक्यात सुचना देवुन माझे जवळ पथकातील कर्मचाऱ्या मार्फत शासकीय व्हाईस रेकॉर्डर चालु करुन देवुन तालुका आरोग्य अधिकारी, कार्यालय अंबड येथे श्री. गावंडे यांना लाचेची रक्कम देण्यासाठी मी हजर केलेल्या 20,000/- रुपये रकमेला अँथ्रासीन पावडर लावुन पंचासोबत रवाना केले. तालुका आरोग्य अधिकारी, अंबड येथे गेल्यानंतर मी श्री. गावंडे यांची भेट घेतली तेव्हा श्री. गावंडे म्हणाले की, तुम्ही कळकुंबे, यांना भेटा तेव्हा मी श्री. कळकुंबे, कनिष्ठ सहाय्यक तालुका आरोग्य अधिकारी, कार्यालय, अंबड जि. यांची भेट घेवुन त्यांना म्हणालो की, काय आहे त्यांचे ते सांगुन द्या ना तेव्हा श्री. कळकुंबे म्हणाले की, किती हे तेव्हा मी म्हणालो की, 20,000/- रुपये तेव्हा त्यांनी पैसे देण्याचा इशारा करताच मी अँथ्रासीन पावडर लावलेले 20,000/- रुपये श्री. कळकुंबे यांना देऊ केले असता त्यांनी लाचेची रक्कम 20,000/- रुपये स्वत : स्विकारुन त्यांचे पँटचे डावे बाजुचे खिशात घातली व वीस आहेत ना या मग तुम्ही असे मला म्हणाले ती वेळ दुपारी 4 वाजुन 15 मिनीटांची होती. मी सापळा पथकास लाच स्विकारले बाबत इशारा केला असता तेथे पोलीस निरीक्षक श्री हनुमत वारे हे त्यांचे सापळा पथकासह हजर आले व श्री. कळकुंबे यांचे कडुन पंचासमक्ष मी दिलेले अँथ्रासीन पावडर लावलेले 20,000/- रुपये जप्त केले आहे.
तरी दिनांक 19/03/2024 रोजी 1) डॉ. शामकांत दत्तात्रय गावंडे, वय- 49 वर्ष, व्यवसाय नोकरी, पद- तालुका आरोग्य अधिकारी, ता.अंबड जि. जालना, रा. कासलीवाल मार्वल, पश्चिम बंगला नं. IB-18 बीडबायपास, निशांत पार्क, छत्रपती संभाजीनगर, यांनी प्राथमिक आरोग्य केंद्र जामखेड व वडीगोद्री येथील मानव विकास शिबीरा अंतर्गत घेतलेल्या 25 कँपची देयके पडताळणी करुन गट विकास अधिकारी, पंचायत समिती अंबड येथे पाठविण्यासाठी तसेच रुग्ण कल्याण समिती ( आर. के. एस. ) ची देयके मंजुर करण्यासाठी माझेकडे पंचासमक्ष प्रती कँप 1,000 /-रुपये प्रमाणे लाचेची मागणी करुन एकुण 25 बिलांचे तडजोडी अंती 20,000/- रुपये आज दिनांक 30/03/2024 रोजी श्री. गावंडे यांचे सांगणे वरुन श्री. पंडीत भीमराव कळकुंबे वय -42 वर्ष, व्यवसाय नौकरी, पद- कनिष्ठ सहाय्यक, तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय, अंबड जिल्हा जालना, रा. प्लॉट नं. 11 शिवनगर, दत्तमंदीराजवळ जुना जालना जि. जालना यांनी तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय, अंबड जि. जालना येथे पंच क्र.1 यांचे समक्ष दुपारी 4 वाजुन 15 वाजेच्या सुमारास स्विकारले आहेत. म्हणुन माझी वरील दोन्ही लोकसेवका विरुध्द कायदेशिर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद माझे सांगणे प्रमाणे संगणकावर मराठीत टाईप केली असुन ती मी वाचुन पाहिली बरोबर व खरी आहे.

हि फिर्याद दिली

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): **or** (किंवा)

Raghunath Kaduba Nachan(I (Inspector)) / PI

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15. Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिक**

**Name (नाव):** Raghunath Kaduba I
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** PI